---

*** प्र क र ण – 6 वे ***

---

## मृत्युलेखकार म्हणून आचार्य अत्र्यांचे स्थान

## अत्र्यांच्या मृत्युलेखांतील गुणदोषांची पाहणी.

### * मृत्युलेखकार म्हणून आचार्य अत्र्यांचे स्थान –

आचार्य अत्र्यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू कलावंताचे आहे. एका विशिष्ट चौकटीत बंदिस्त न करता येणारे हे व्यक्तिमत्त्व. प्रथमपासूनच जीवनाबद्दल त्यांना जिज्ञासा असल्याने त्यांची वृत्ती जीवनाकडे अभिरुचीसंपन्न पद्धतीने पाहण्याची आहे. त्यांनी जीवनात अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली. शिक्षक, कवी, विडंबनकार, नाटककार, चित्रपटकार, कथाकार, कादंबरीकार, पट्टीचे वक्ते, कुशल राजकारणी, निर्भिड, मिश्किल व रोखठोक पत्रकार अशा अनेक क्षेत्रांमध्ये ते वावरले. त्यामुळे त्यांचे उभे आयुष्य विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या ऋणानुबंधांच्या आणि हितसंबंधाच्या गुंतावळयात गुंतले होते.

पत्रकारितेच्या निमित्ताने त्यांनी 'नवयुग' ह्या साप्ताहिकातून व 'मराठा' ह्या दैनिकातून जे अग्रलेख लिहिले त्यातीलच एक भाग म्हणजे त्यांनी लिहिलेले मृत्युलेख. हा प्रसंगोपात वाड्.मय प्रकार परकीय भाषेतून वृत्तपत्रीय लेखनाच्या निमित्ताने मराठी वाड्.मयात आला. अर्थात अनेक पत्रकारांनी आपल्या वृत्तपत्रांसाठी हा वाड्.मयप्रकार हाताळला असला तरीदेखील आचार्य अत्र्यांमुळे ह्या वाड्.मय प्रकाराला प्रतिष्ठा प्राप्त झाली हे अत्र्यांचे ह्या वाड्.मय प्रकारावरचे ऋण मराठी पत्रकारितेच्या इतिहासात डावलता येत नाही. आजपर्यंतच्या पत्रकारितेत तरी अत्र्यांचे मृत्युलेखकार म्हणून विशेष स्थान आहे. मृत्युलेखाच्या लेखनासाठी त्यांना कोणतीही व्यक्ती वावडी वाटली नाही. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वाड्.मयीन क्षेत्रातील व्यक्तींवर, कलावंतांवर तर त्यांनी मृत्युलेख लिहिलेच पण त्यांच्या गाडीच्या ड्रायव्हरवर, त्यांच्या गावात महापुरात वाहून गेलेल्या 'विष्णू ब्रह्मे' वर त्यांना माहित असणा–या वसंत आणि मालती यांच्या हृदयद्रावक प्रेमकथेवरही त्यांनी मृत्युलेख लिहिले.

त्यामुळे प्रसिद्ध व्यक्ती किंवा अप्रसिद्ध व्यक्ती असा भेदभाव त्यांनी मृत्युलेखांच्या लेखनासाठी केला नाही. त्यांनी जसे आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या प्रसिद्ध व्यक्तींवर मृत्युलेख लिहिले तसेच फक्त त्यांनाच माहिती असणा–या काही अप्रसिद्ध व्यक्तींना मृत्युलेखांचे विषय बनवून वाड्.मयीन अमरत्व प्राप्त करुन दिले. जगाच्या दृष्टीने विशेष प्रसिद्ध किंवा महत्त्वाची नसणारी माणसेही अत्र्यांना मृत्युलेख लेखनासाठी महत्त्वाची वाटली. त्यांच्या जीवनातीलही काही समाजाला सांगावे असे त्यांना वाटले आणि यशस्वी पद्धतीने ते त्यांनी सांगितले. जीवन सामान्य व्यक्तीचे असो अगर असामान्य व्यक्तीचे असो. अत्रे व्यक्ती म्हणून तिचे यथोचित मूल्यमापन करतात.

मृत्युलेखकार म्हणून आचार्य अत्र्यांचा आपणास खालील अंगाने विचार करता येईल.

1) अत्र्यांच्या मनाला असणारे कारुण्याचे स्वाभाविक आकर्षण –

अत्रे विडंबनकार, नाटककार, विनोदी लेखक म्हणून जरी यशस्वी झाले असले तरी त्यांच्या मनाला मात्र कारुण्याचे स्वाभाविक आकर्षण होते. विनोदी लेखक म्हणून त्यांचा पिंड परिस्थितीनुरुप घडत गेला. खुद्द अत्र्यांनीच आपण गडकरीभक्त असल्याचा उल्लेख केला असून अगदी लहानपणापासून त्यांना गडक–यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आकर्षण होते. आपण आयुष्यात ठरवले एक आणि झालो मात्र दुसरेच अशी कबुली स्वतः अत्रेच देतात, "मला बालकवी व्हायचे होते. मला गोविंदाग्रज व्हायचे होते. त्यासाठी माझी खटपट चालू होती ; पण ते सगळे राहिले बाजूला आणि 'देवाच्या आळंदीला पोहोचायच्या ऐवजी मी चोरांच्या आळंदीला जाऊन पाहोचलो ।"[1] त्यामुळे अत्र्यांच्या मनाला विनोदापेक्षा कारुण्याचेच आकर्षण अधिक होते हे स्पष्ट होते. ह्या आकर्षणामुळेच त्यांनी मृत्युलेखांचे लेखन केल्यामुळे त्यावर त्यांच्या मूळ स्वभाव धर्माचा ठसठशीत ठसा उमटला आहे.

योगायोगाने अत्र्यांची व गडक–यांची ओळख झाल्यानंतर पुढे त्यांनी ज्यांना आपले पत्रकारितेतील गुरु मानले त्या अच्युतराव कोल्हटकरांच्या आणि गडक–यांच्या गप्पा ऐकण्याचा लाभदेखील त्यांना गडक–यांच्या माडीवर आला. पुढे ते मुंबईला आल्यानंतर टिळकांचे मुंबईच्या सरदारगृहात निधन झाल्यावर अच्युतराव आपल्या 'संदेश' पत्रासाठी टिळकांवर मृत्युलेख लिहित असतानाचे ऐतिहासिक दृश्य ते पुन्हा पुन्हा जाऊन पाहतात. मुंबईत त्यांची शिक्षकाची नोकरी सुरु असतानाच मुंबईतील टिळक भक्तांनी लोकमान्यांच्या स्मरणार्थ सुरु केलेल्या 'लोकमान्य' पत्राच्या संपादकीय वर्गात शिरण्याचाही ते प्रयत्न करतात. परंतु संपादकीय कामाचा अनुभव नसल्यामुळे तेथे त्यांना इच्छा असूनदेखील काम करण्याची संधी मिळत नाही. यावरुन त्यांच्या मनातील

पत्रकारितेबद्दलचेही आकर्षण दिसून येते. पुढे त्यांनी योगायोगाने अनेक उद्योग केले. नाटके लिहिली. चित्रपट काढले. परंतु अत्रे पत्रकारितेतच अधिक रमले. त्यांनी इतर व्यवसाय करीत असताना स्वतःला गुदगुल्या करुन कृत्रिमपणे हसवले आणि मृत्युलेख लिहित असताना अश्रूंचे ओहळ मात्र स्वाभाविकपणे गाळले. त्यांनी लिहिलेले बव्हंशी मृत्युलेख म्हणजे कारुण्याचा अविष्कार असून पत्रकाराच्या भूमिकेतून त्या त्या व्यक्तींना वाहिलेली आदरांजली होय. ही वाड्.मयीन आदरांजली म्हणजे अत्र्यांनी नव्या पिढीसमोर जुन्या पिढीतील व्यक्तींचे ठेवलेले त्यांच्याच म्हणून शैलीतील स्मरण होय. ह्या लेखनामधून अत्र्यांच्या मनातील उत्कट भावनांचा उत्स्फूर्त अविष्कार झाला असून तत्कालीन भावनातिरेकातून हे लेखन झाले आहे. त्यामुळे यात साहजिकच झपाटलेपण आले असून काही लेखांमध्ये तर अक्षरशः अंतःकरणातील उर्मी दाटून येतात.

2) <u>अत्रे लिखित मृत्युलेखांमधून व्यक्त होणारे अत्र्यांचे व्यक्तिमत्त्व</u> –

अत्र्यांचे व्यक्तिमत्त्व संवेदनशील कलावंताचे आहे. ते नाटककार आहेत, कवी आहेत, शिक्षक आहेत, वक्ते आहेत. त्यामुळे या सर्व बाबींचे प्रत्यंतर त्यांनी लिहिलेल्या मृत्युलेखांमधून येते. ते नाटककार असल्यामुळे लेखनात नाटय येते. कवी असल्यामुळे काव्यमय दृष्टिकोन व्यक्त होतो. शिक्षकाची समजून देण्याची शैली त्यांच्या व्यक्ती समजून देण्यामध्ये दिसते. ते वक्ते असल्यामुळे लेखनास वक्तृत्वाची छटा येते. ते आपणाशी बोलताहेत असेच मृत्युलेख अभ्यासताना वाटते. त्याचप्रमाणे त्यांचे प्रचंड अनुभवविश्व, व्यासंग, महाराष्ट्र आणि मराठी भाषेबद्दलचे प्रेम, त्यांच्यामधील सामर्थ्यशाली प्रतिभावंत, गुणग्राहक वृत्ती, प्रचंड लोकसंग्रह, प्रसंगी घणाघाती प्रहार करणारे आणि तितकेच हळहळणारे भावुक मन, सामान्यांच्याही जीवनात जीवनार्थ शोधणारे मन, जीवनविषयक स्वीकारात्मक दृष्टिकोन, व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे सूक्ष्म निरीक्षण इत्यादी अत्र्यांच्या स्वभाव विशेषांचे प्रतिबिंब मृत्युलेखांमध्ये पडलेले दिसते. त्यांच्यामधील धीट पत्रकारिता आणि व्यक्ति पूजकतेचेही दर्शन ह्या लेखनात होते.साने गुरुजी, साहित्यसम्राट न. चिं. केळकर, जॉर्ज बर्नार्ड शॉ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विन्स्टन चर्चिल, लाल बहादूर शास्त्री, पंडित नेहरु, काकासाहेब लिमये, कवी 'बी' इत्यादी बव्हंशी मृत्युलेखांमधून अत्र्यांच्या व्यक्ति पूजकतेचे दर्शन घडते. मात्र काही मृत्युलेखांमधून त्यांच्या मधील धीट पत्रकार त्या व्यक्तीच्या दोषांचे दिग्दर्शनही करतो. "याचे कारण एकच, माणसात जोपर्यंत अत्र्यांना 'देवत्व' दिसले तोपर्यंत त्यांनी त्याची पूजा केली. जेथे ते

ढळ लेले आढळले तेथे म्हसोबाची 'पूजा' करणारा त्यांच्यातील तरुण जागा झाला."[2] मृत्युलेखांमधूनही अत्र्यांचा हा दृष्टिकोन दिसून येतो. विन्स्टन चर्चिल हा भारताच्या दृष्टीने भारताला 150 वर्षे गुलामगिरीत ठेवणा-या इंग्लडच्या पंतप्रधान. त्याच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल अत्र्यांच्या मनात नितांत आदर आहे. मात्र पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल 'बॅ. मरहूम महमदअली जिना' या घरभेदी व्यक्तिमत्त्वाबद्दल अत्रे पूर्णपणे दोषांचेच दिग्दर्शन करतात. "मनुष्य मेल्यानंतर त्याजबद्दल वाईट लिहू नये, अशी एक सभ्य रीत आहे. ती जरी आम्हाला मान्य असली, तरी मनुष्य मेल्यानंतर त्याजबद्दल खोटे लिहिणे हेही पण काही फारसे सभ्यपणाचे होणार नाही, अशी आमची समजूत आहे."[3] असा स्पष्ट निर्वाळा देऊन जिनांच्या घमेंडी, घरभेदी, राष्ट्रविरोधी, धर्मवेडेपणा, कट्टर जातीयवादी, तत्त्वहीन धर्माभिमानाबद्दल त्यांचे प्रामाणिक मत प्रतिपादन अत्यंत संयमाने ते मांडतात. येथे त्यांच्यामधील सच्चेपणाचे दर्शन घडते. ते जेवढ्या स्वाभाविकपणे साने गुरुजींच्या सहृदयतेबद्दल व अश्रूंच्या सामर्थ्याबद्दल समरसून भाष्य करतात. तेवढयाच सहजपणे शेजवलकरांच्या स्त्रीलंपटपणावर' नानासाहेब चापेकरांच्या विचारांमधील मोठेपणाबरोबरच त्यांच्या काही विचारांमधील फोलपणाची देखील उदाहरणे देतात. अत्र्यांची ही वृत्ती बहुतांशी मृत्युलेखांमधून दिसून येते. ते व्यक्तीचे नुसते अंध भक्त नाहीत तर त्याच्याजवळ व्यक्तीविषयीचा डोळसपणा आहे. आणि ह्या भूमिकेतूनच ते व्यक्तीविषयीचे भाष्य करताना कौतुकाच्या किंवा व्यर्थ गुणगौरवाच्या महापुरात वाहून जात नाहीत तर तारतम्याने तिच्या दोषांचेही दिग्दर्शन करतात. एखाद्या वेळेस व्यक्तीच्या गुणाचे ते अतिशयोक्तीपूर्ण वर्णन करतील पण दोषांना गुण म्हणण्याचा वेडेपणा कधीही करीत नाहीत. अशा त्यांच्या म्हणून स्वभावविशेषांचे दर्शन त्यांनी लिहिलेल्या मृत्युलेखांमधून घडते. मृत्युलेखात अधूनमधून त्यांचे व्यक्तिमत्त्व जरी डोकावत असले तरी ते अजिबात खटकत नाही. उलट ते यथोचितच वाटते.

3) <u>अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वावर असणारा काही व्यक्तींचा प्रभाव</u> –

अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वावरील राम गणेश गडकरी, अच्युतराव कोल्हटकर, रँग्लर परांजपे, भीमराव खंडेराव कोरान्ने या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वांचा प्रभाव व त्यांच्याविषयीची अत्र्यांच्या मनामधील निष्ठा काही मृत्युलेखांमधून व्यक्त झाली आहे. 'महाराष्ट्राच्या सम्राटाचे निर्याण' ह्या तात्यासाहेब केळकरांवरील मृत्युलेखात गडक-यांचे शिष्यत्व ते सार्थपणे मिरवतात तर 'पुरुषोत्तम रामचंद्र लेले' यांनी गडक-यांच्या 'पुण्यप्रभावा' वर 'ज्ञानप्रकाश' आणि 'इंदुप्रकाशा'त लिहिलेले टीकालेख वाचून

अत्रे अतिशय चिडतात. " 'पुण्यप्रभाव' नाटक हृदयात जागया होणा-या परमेश्वराच्या प्रभावावर आधारलेले आहे. त्या 'ईश्वरा' ची लेल्यांनी आपल्या पत्रात खूपच टर उडविली होती. ती आमच्यासारख्या गडक-यांच्या आंधळया भक्ताला कशी काय रुचणार ? ..... पण गडक-यांवर टीका करणा-याला आमच्या हिशोबी फारशी किंमत नसे. म्हणून मराठी नाटकाशी लेल्यांचा काही संबंध आहे किंवा त्या विषयात त्यांना काही गम्य आहे, ह्या गोष्टीकडे आम्ही त्यावेळी कधीच लक्ष दिले नाही."[4] असे प्रत्युतर ते त्यांच्यावरील मृत्युलेख लिहित असतानाच देतात. अत्र्यांचे पत्रकारितेतील गुरु अच्युतराव कोल्हटकर यांच्या शैलीचा सोदाहरण उल्लेख ते 'गो. म. चिपळूणकर : कांही आठवणी' ह्या बापूसाहेब चिपळूणकरांवरील मृत्युलेखात करतात. रँग्लर परांजपांच्या स्वतःवरील प्रभावाबद्दल अत्रे म्हणतात, "त्यावेळी आमची राजकीय निष्ठा लोकमान्य टिळकांच्या चरणी वाहिलेली होती, पण आमच्या शैक्षणिक आणि सामाजिक निष्ठा मात्र अप्पांच्या चरणी समर्पित होत्या. तेव्हापासून त्यांच्यावर आम्ही जी भक्ती करीत आलो, तिच्यामध्ये अखेरपर्यंत कधीही अंतर पडले नाही...... अप्पासाहेबांच्या आवडत्या गणित विषयाच्या भाषेतच बोलायचे तर आम्हांला त्यांच्याविषयी वाटणारा परम आदर आणि त्यांना आमच्याविषयी वाटणारी आपुलकी यांना केवळ बेरजेचे नि गुणाकाराचेच नियम लागू होते. या संबंधामध्ये वजाबाकीला आणि भागाकाराला स्थानच नव्हते."[5] अशा शब्दात ते आपली रँग्लर परांजप्यांबद्दलची निष्ठा व्यक्त करतात. मात्र ना. सी. फडक्यांनी त्यांच्या 'माझ्या साहित्यसेवेतील स्मृति' या ग्रंथात आप्पासाहेबांबद्दल अनादर व्यक्त केल्याबद्दल "ना. सी. फडक्यांना सूर्यावर थुंकून स्वतःची फजिती करुन घेण्याची सवयच आहे, त्याला काय इलाज !"[6] अशा शब्दात ते फडक्यांविषयी निषेध नोंदवतात. 'भीमराव खंडेराव कोरान्ने' यांच्यामुळेच आपणाला लघुकथा लेखनाची स्फूर्ती मिळाली असे ते नम्रतापूर्वक सांगतात. अशा प्रकारे काही मृत्युलेखांमधून अत्र्यांनी काही व्यक्तींचा स्वतःवरील प्रभाव नम्रपणे व्यक्त केला आहे व या व्यक्तींविषयी अनादर व्यक्त करणा-यांना तिखटपणे सुनावलेही आहे.

4) अत्र्यांचा मृत्युलेख लेखनविषयक दृष्टिकोन -

अत्र्यांचा मृत्युलेख लेखनाविषयीचा दृष्टिकोन व्यापक व प्रगल्भ असल्यामुळे हे लेखन जरी प्रसंगोपात झाले असले तरी त्याचे स्वरुप मात्र प्रासंगिक राहात नाही तर हे लेखन कधी कथा सदृश होते तर कधी स्वभावचित्राच्या, जीवनविषयक चिंतनाच्या, अनुभव कथनाच्या अंगाने वाङ्मयीन रुप धारण करते. "सज्जनांचा पुरस्कार, अनाथांचा कैवार अन् दांभिकांचा धिक्कार अशा विचारांच्या नि

भावनेच्या विविध क्षेत्रांमधून पत्रकाराला विहार करावा लागतो. अनेक रसांची कारंजी त्याला आपल्या प्रतिभेमधून खेळवावी लागतात. 'मृत्युलेख' ही तर पत्रकाराच्या लेखनसामर्थ्याची सर्वात मोठी कसोटी आहे. किंबहुना 'मृत्युलेख' ही पत्रकाराची 'वार्षिक परीक्षा' च होय. सार्वजनिक माणसाचा मृत्यू ही वृत्तपत्रीय जीवनामधील एक अत्यंत महत्त्वाची घटना होय. त्या व्यक्तीच्या जीवनाचे आणि कार्याचे मूल्यमापन करताना केवळ त्यांच्या चरित्रामधल्या प्रसंगांची जंत्री देऊन भागत नाही तर तो ज्या राजकीय, सामाजिक, वा वाङ्.मयीन प्रवृत्तींचा प्रतिनिधी असेल, त्याचे अत्यंत रसपूर्ण आणि मार्मिक विश्लेषण संपादकाला करावे लागते. ही सर्व माहिती जमा करावयाला वेळही फारसा नसतो. व्यापक सहानुभूती आणि प्रखर स्मरणशक्ती ह्यांचे भरपूर भांडवल जर संपादकाजवळ नसेल तर तो ह्या कसोटीमधून उत्तीर्ण होणे कठीण आहे."[7] असे अत्र्यांनी मृत्युलेखां' विषयीचे विवेचन केले आहे. त्यामधून त्यांचा मृत्युलेख विषयक दृष्टिकोन तर स्पष्ट होतोच पण त्याबरोबरीने त्यांच्याजवळ त्यांना अपेक्षित असणारे भांडवल विपुल प्रमाणात असल्यामुळे ते 'मृत्युलेख' लेखनाच्या कसोटीवर उत्तीर्ण होतात. मृत्युलेखाच्या लेखनात ते जंत्रीवजा मजकूर जाणीवपूर्वक टाळतात. ब–याच वेळा ते व्यक्ती विषयीच्या आंत्यंतिक आदराच्या भूमिकेतून व्यक्ती व तिच्या जडणघडणीच्या पार्श्वभूमीच्या अंगाने तिच्या जीवनव्यापी आढावा घेतात. मात्र हा आढावा कोरडा ठणठणीत असत नाही. त्याच्या जोडीला अत्र्यांच्या चिंतनशीलतेचे व भावनिकतेचे पदर येतात. त्यामुळे लेखनात करुणरम्यता, उदात्तता व उत्कटतेचे प्रत्यंतर पदोपदी येत राहते. व्यक्तीविषयक आदर व्यक्त करीत करीतच ते व्यक्तीच्या स्वभावातील गुणदोषांचे चित्रण करतात. व्यक्तीची पार्श्वभूमी, संस्कृती, कार्यक्षेत्र यांचा विचार करीत जर तिच्याशी त्यांचा वैयक्तिक संबंध असेल तर काही आठवणींच्या माध्यमातून तिच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवतात. संबंध नसेल तरीदेखील त्यांचे त्या व्यक्तिमत्त्वाबद्दलचे आकलन व्यक्तींवर झाले असल्यामुळे त्यात अनेकांगी चित्रण येते. माहितीचे तपशील देत असतानाही त्यात रुक्षता येत नाही. लेखनात जरी भावविवशता असली तरी ते केवळ भावनेच्या पुरात वाहात जात नाहीत तर ते व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रभावी दर्शन घडवतात. त्यातून त्यांचा व्यक्तिविषयीचा जिव्हाळा, समरसता व्यक्त होते.

मृत्युलेखांचे लेखन संदर्भानुसार बदलते. कधी ते चरित्र वर्णनपर होते. कधी घटनाप्राचुर्य,

आठवणी सांगण्याच्या स्वरुपाचे होते. तर कधी स्वभावचित्राच्या अंगाने होते. मात्र ज्या पद्धतीने ते होते त्यातून व्यक्तीच्या जीवनाचा विवेचक शोध ते घेतात. तिचे कार्यक्षेत्र, वैचारिकता यांचे दर्शन घडवताना त्या व्यक्तीविषयी त्यांच्या मनातील स्नेहभाव, आदर, जिव्हाळा व्यक्त होतो. कधी तौलनिक दृष्टिकोण स्वीकारुन ते मृत्युलेख ज्या व्यक्तीवर आहे तिचा मोठेपणा सिद्ध करतात तर कधी तिच्या चुकांचे दिग्दर्शनही करतात. या अनुषंगाने अत्र्यांच्या सामाजिक, राजकीय विचारप्रणालींचे दर्शन घडते. व त्यांचे विचार, अनुभव मतेही व्यक्त होतात. त्यांची बहुश्रुतता व व्यासंगाचेही प्रत्यंतर मृत्युलेखांमध्ये येते.

व्यक्तीच्या बाह्यचित्रणाबरोबरच ते व्यक्तिमनाचेही चित्रण करतात. तिच्या जीवनेतिहासाचा विवेचक शोध घेतात. यासाठी आवश्यक असणारे व्यक्तीविषयीचे सूक्ष्म अवलोकन त्यांच्याजवळ असते. भावनिक ओलाव्यामुळे हे लेखन भावमधुर होते. त्यात भावगीतात्मकता येते. अत्र्यांचे अनुभवविश्व व्यापक असल्याने व त्यांची स्मरणशक्ती प्रखर असल्यामुळे ते मृत्युलेख यशस्वी रितीने फुलवू शकतात. सागर किना–यावरच्या मऊशार वाळूतून चालताना पाउलांचे ठसे ज्याप्रमाणे वाळूत उम्टतात त्याप्रमाणे अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे, शैलीचे, वृत्तीचे ठसे या लेखनात उमटताना जाणवतात.

5) <u>मृत्युलेखांमधून व्यक्तीच्या जीवनाचे होणारे यथोचित मूल्यमापन –</u>

अत्र्यांनी लिहलेल्या मृत्युलेखांमधून ते व्यक्तीचा उचित गौरव करतात. तिच्याविषयीचा आदर, जिव्हाळाही व्यक्त करतात. बव्हंशी लेखांमधून तीव्र भावनाशीलतेचे प्रत्यंतर येते. तिची जडणघडण, वैचारिकता, कार्य या सा–यांचे दर्शन घडवत असताना ते तिच्या जीवनाचे यथोचित मूल्यमापन करुन तिच्या जीवनातून गवसणा–या जीवनाशयाचे व जीवनसंदर्भाचे दर्शन घडवतात. "मरणविषयासंबंधीचे गौरवाचे, आदबशीरपणाचेच उद्गार ही जुनी कल्पना झाली. महाप्रस्थान विषयक तत्त्वज्ञान हेही पुराणे झाले. गेलेली व्यक्ती नेमकी काय होती, भोवताली असलेल्या परिस्थितीतून तिच्या जीवनकार्याचा परिपाक काय निर्माण झाला आणि संस्थात्मक समाजजीवनावर त्याचे काय असर झाले किंवा होतील, याचे धावते दिग्दर्शन अत्रे मृत्युलेखांतून करताना आढळतात. त्यामुळे अत्र्यांची व्यक्तिचित्रे – मृत्युलेख यांची घडी करुणरम्य, उदात्त, उत्कट, माहितीच्या तपशीलांनी परिपूर्ण – चैतन्यप्रद आहे."[8] या भूमिकेतून अत्र्यांनी हे लेखन केलेले असल्यामुळे ते व्यक्तीच्या जीवनाचे

यथोचित मूल्यमापन करीत असताना अत्रे व्यक्तीला योग्य न्याय देतात. मग ती व्यक्ती सामान्य असो अगर असामान्य. त्यांच्या गाडीचा ड्रायव्हर बाबू पासून ते आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कित्येक व्यक्तींच्या जीवनात त्यांना जे काही भावले ते त्यांनी मोठया आत्मीयतेने व्यक्त केले. व्यक्तीच्या जडणघडणीची पार्श्वभूमी, तिच्या कार्याचा समाजावरील व स्वतःवरील ठसा, त्या व्यक्तीच्या जीवनात त्यांना गवसलेले मर्म, तिची सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमी. तिचा वैचारिक विकास, वाङ्मयीन विकास, व्यक्तिमत्त्वातील गुणवैशिष्टये नोंदवत असतानाच तिच्याबद्दलची भावनिकता, जिव्हाळा, प्रेम, भक्ती, आदर व अभिमान ते व्यक्त करतात. या पार्श्वभूमीवर ते व्यक्तीच्या जीवनाचे मूल्यमापन करतात. त्यामुळे स्वाभाविकपणे ह्या लेखनास जिवंतपणा प्राप्त होतो. ते व्यक्तीजीवनाचे अनेकांगी दर्शन घडवतात. तिच्या जीवनातील त्यांना जे काही भावते त्याबद्दल कमालीच्या आस्थेवाईकपणे व भावुकतेने ते भाष्य करतात. त्याचप्रमाणे एकाच व्यक्तीवर लिहिलेल्या मृत्युलेखांच्या मालिकेत तर अत्र्यांना हे सहज शक्यहोते. इतका लहान एवढा महान' या शास्त्रींवरील मृत्युलेखसंग्रहात ते शास्त्रीजींनी अल्पावधीत केलेले कार्य, त्यांचे देशाच्या स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने नेमके विचार, आचारविचारांमधील समन्वय, त्यांचे द्रष्टेपण या अनुषंगाने त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करुन त्यांच्या कार्याची महती पटवून देतात. 'दलितांचे बाबा' या ग्रंथातही बाबासाहेबांच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवून दलितोद्धारासाठी त्यांनी केलेल्या कार्याचे महत्त्व ते विशद करतात. मात्र 'सूर्यास्त' मधील लेखांचे स्वरुप बरेचसे भावकाव्यात्मक असल्याने त्यात भावनिक बहर, फुलोरा अधिक असल्याचे जाणवते. नेहरुंच्या व्यक्तित्त्व दर्शनासोबत त्यांची वैचारिकता व काव्यमय दृष्टिकोन यांचे दर्शन बव्हंशी मृत्युलेखांमधून घडत असले तरी काही मृत्युलेखांमधून अत्र्यांनी नेहरुंच्या जीवनाचे व वैचारिकतेचे मूल्यमापन करुन "व्यवहाराच्या वास्तववादी जगातून नेहरु कवचितच चालले असतील किंवा फिरले असतील ! कल्पनासृष्टीतील ध्येयवादाच्या ढगावरुन एखाद्या गरुडाप्रमाणे ते भरा-या मारीत असत. आपल्या कोटाच्या गुंडीला अडकविलेल्या गुलाबाप्रमाणे सा-या जगात गुलाबांच्या पाकळयांचे गालिचे अंथरता येतील असे त्यांना वाटे".[9] असा निर्वाळा देऊन नेहरुंच्या कल्पनारम्य व आदर्शांच्या पातळीवरील उच्चविचारांचा व्यावहारिक पातळीवर मेळ जमला नाही हेही नमूद करतात. ते व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील केवळ गुणगौरव करुन थांबत नाहीत तर तिच्या काही मर्यादांचीही ते नोंद घेतात. त्यामुळे केवळ वैयक्तिक भुलावणीच्या भूमिकेतून हे मूल्यमापन न होते ते यथोचित होते.

6) <u>मृत्युलेखांची लेखनशैली</u> –

अत्र्यांमधील कवी, नाटककार, शिक्षक व वक्ता यांचे एकत्रित प्रत्यंतर त्यांनी लिहिलेल्या मृत्युलेखांच्या लेखनशैलीत येते. त्याचप्रमाणे हे लेखन वृत्तपत्रीय असल्यामुळे पत्रलेखनाची भाषा येथे दिसते. अगदी साध्या, सरळ भाषेत अत्रे भावगंभीर आशय सांगताना 'वाचकहो', 'अमुक अमुक यांचे वयाच्या अमुक अमुकाव्या वर्षी अमुकअमुक येथे निधन झाले.' 'दिवंगत झाले', 'देवाज्ञा झाली' अशा साध्या भाषेत संवाद करतात आणि मग हळूहळू भाषेस भावगांभीर्य प्राप्त होते. तिच्यात काव्यात्मकता, अलंकारिकता, प्रासात्मकता येते.

मृत्युलेखाचे निवेदन अत्रे वक्त्याच्या शैलीत करतात त्यामुळे ब–याच वेळा मृत्युलेख वाचत असताना अत्रे बोलत आहेत व आपण ऐकत आहोत असे वाटते. "अत्रे हे हाडाचे शिक्षक आहेत. आणि आपल्या वैविध्यपूर्ण पण सुगम लेखनातून, वक्तृत्वातून त्यांनी लोकशिक्षकाची कामगिरी यशस्वीपणे पार पाडली आहे....... शेवटच्या बाकावर बसलेल्या मुलाला आणि सर्वात पाठीमागे बसलेल्या श्रोत्यालाही आपले लिहिलेले आणि बोललेले समजले पाहिजे असा अत्र्यांचा आग्रह आहे. आपले वृत्तपत्र ज्या साक्षर अशा सामान्यांच्या हातात जाणार असते त्यांच्या भावनांना अत्र्यांना स्पर्श करावयाचा असतो."[10] या भूमिकेतूनच ते संवाद करावा अशा भाषेत लिहितात. मात्र ह्या संवादात भावनिक ओलावा असतो. उत्कटता असते. करुणरम्यता असते व काव्यमयताही असते. अत्रे वाचकाशी हृदयसंवाद करीत असताना त्यांच्या भाषेत रसाळपणा येतो. करुणरम्य सुभाषिते ते ऐकवतात. व्यक्तीच्या जीवनातील एखादी घटना, प्रसंग सांगत असताना ते चित्रमय शैलीत ती घटना, प्रसंग साक्षात वाचकासमोर उभा करतात. त्यांच्या वर्णनशैलीत आशयाचा सूक्ष्मपणा आहे. भाषेला गतिमानता आहे. भाषेला अत्र्यांचेच म्हणून एक तेज आहे. ती कोठेही कोरडी होत नाही. इथून तिथून तिच्यात भावनिक ओलाव्यामुळे स्नेहार्द्रतेचे प्रत्यंतर येत राहते. ते नाटककार असल्यामुळे मृत्युलेखांच्याही लेखनशैलीत काहीशी नाटयमयता येते. कवी असल्यामुळे काव्यमयता, अलंकारिकता येते. अत्रे गडकरीभक्त आहेत त्यामुळे गडक–यांच्या कारुण्य व उपहासगर्भतेचे संस्कार त्यांच्यावर आहेत. मात्र गडक–यांची शैली जशीच्या तशी त्यांनी उचललेली नाही. स्वतःच्या लेखनशैली विषयी '<u>मी कसा झालो</u>' ह्या वाङ्मयीन आत्मशोधनात ते म्हणतात. "आज माझी जी लेखनशैली आहे; ती माझी स्वतःची आहे हे माझ्या शत्रूंना मान्य करावे लागेल. तिच्यात गडकरी शैलीची ऐट आहे. पण तिच्यावर गडक–यांची छाप मात्र नाही. गडक–यांच्या भाषेचे मला अपचन झालेले नाही. मेहनत करुन मी ती चांगली पचविली आहे. म्हणूनच गडक–यांच्या भाषेचा क्लिष्टपणा आणि अतिरेक माझ्या

ननात औषधापुरता देखील आज मिळणार नाही."[11] त्यामुळे जरी त्यांच्यावर गडक–यांचे संस्कार असले तरी त्यांनी त्यांची नक्कल केलेली नाही किंवा कित्ताही गिरवलेला नाही. त्यांनी त्यांची म्हणून एक लेखनशैली परिश्रमपूर्वक साकारली आहे. मृत्युलेखातील कलानुभव हाच मुळी करुण असल्यामुळे त्यात स्वाभाविकपणे करुणरसाचा अविष्कार जागोजागी येतो. त्याला ते काव्यमयतेची व अलंकारिकतेची जोड देतात. त्यामुळे तिच्यात साहजिकच रसाळपणा येतो. शिवाय अत्र्यांचे व्यासंगी व्यक्तिमत्त्व पदोपदी जाणवते. अनेक दाखले देऊन त्यांना व्यक्तीविषयी जे काही सांगायचे आहे ते सोदाहरण पटवून देतात. त्यांच्या भाषेत कल्पनाविलास आहे पण त्याला वास्तवाचे भान आहे. निव्वळ कल्पनाविलासाच्या हव्यासापायो ते कधीच वाहात जात नाहीत. व्यक्तीच्या जीवनातील प्रसंगचित्रण करीत असताना तिच्यात चित्रमयता येते. त्यांच्या मनातील भावनिक हिंदोळे व्यक्त होत असताना काही करुणरम्य सुभाषितांचा अविष्कार ते सहजपणे करतात. मात्र त्यामागे त्यांची चिंतनशीलता व प्रगल्भता असते. उदाहरणार्थ, "क्षणिक निरोपात शेवटच्या निरोपाचे आणि तात्कालिक वियोगात कायमच्या वियोगाचे हृदयाला भय वाटते."[12] शरीरापेक्षा जगात मौल्यवान अशी कोणती वस्तू आहे? ह्या वस्तूवर अकस्मात दरवडा पडल्यावर आत्म्याला केवढा शोक होत असेल ? ह्या शोकाचे समाधान प्रत्यक्ष परमेश्वराला तरी करता येईल काय ?"[13] अशा प्रकारची एकापेक्षा एक जीवनविषयक प्रगल्भता व अर्थवत्ता व्यक्त करणारी करुणरम्य सुभाषिते निवेदनाच्या ओघात त्यांच्या शैलीतून निर्माण होतात.

एकंदरीत अत्र्यांच्या लेखनशैलीत आशयाचा सूक्ष्मपणा आहे. करुणरम्य रसाळपणा आहे. वास्तवाचे भाव असणारा कल्पनाविलास आहे. चित्रमयता आहे. अभिव्यक्तीचा रेखीवपणा आहे. साधेपणा आहे आणि प्रवाहीपणाही आहे. जीवनविषयक प्रगल्भता, अर्थवत्ता, व्यक्तीविशिष्टता, जीवनविषयक जाणिवांसंबंधीची संवेदनशीलता आणि या सा–या पाठिमागे असणारी चिंतनशीलताही आहे. तिच्यात कुसुमकोमलता आहे तशीच उपहासगर्भताही आहे. तिच्या सुबोधतेत आकर्षकता, मृदुता व परिणामकारकता आहे. तर तिच्या प्रासात्मकतेत नादमयता, यमकबद्धता व लयदारपणा आहे. या सर्व बाबींचा सुंदर मिलाफ अत्र्यांच्या मृत्युलेखांमधील लेखनशैलीत झाल्यामुळे त्यांची शैली हृदयंगम झाली आहे.

7) अत्र्यांचे मृत्यूविषयक तत्त्वज्ञान –

अत्र्यांच्या मृत्युलेखात व्यक्तीचे व्यक्तित्त्वदर्शन, तिची सामाजिकता, जडणघडणीची

पार्श्वभूमी, तिच्याशी जर त्यांचा व्यक्तिगत संबंध असेल तर त्याचे चित्रण, तिच्या जीवनातील घटना, प्रसंग, स्वभावातील गुणदोष या अनुषंगाने निवेदनाच्या ओघात तिच्या मृत्यूच्या निमित्ताने मृत्यू या संकल्पनेविषयी अत्र्यांचे तत्त्वज्ञानही येते. डॉ. एस. एस. भोसले आपल्या 'प्र. के. अत्रे : साहित्य आणि समीक्षा' या ग्रंथात म्हणतात, "अत्र्यांनी विपुल मृत्युलेख लिहूनही मरणाचे स्वतंत्र असे तत्त्वज्ञान विशद केल्याचे आढळत नाही. "किती शोक करावा ? अन दुःख करुन उपयोग तरी काय ?.... नाभिनन्देत मरणम्, नाभिनन्दैत जीवितम्"। हे आणि एवढेच खरे आहे. संसारात ह्याच तत्त्वज्ञानाचा अंगीकार अखेर करावा लागतो ।" असे, अत्रे सर्वसाधारण सूत्र सांगताना आढळतात. फार खोल जातनाहीत. अत्र्यांचे हळवे कविमन मरण – चिकित्सा करायला धजलेले नाही."[14] एस. एस. भोसले यांच्या म्हणण्याप्रमाणे अत्र्यांनी स्वतंत्र लेख लिहून त्यांचे मृत्यूविषयीचे तत्त्वज्ञान विशद केले नाही हे खरे आहे. परंतु अत्रे मृत्यूविषयक तत्त्वज्ञान सांगताना खोल जात नाहीत. असे मात्र म्हणता येणार नाही. तसेच अत्र्यांचे हळवे कविमन मरणचिकित्सा करायला धजत नाही असेही म्हणता येणार नाही. त्यांनी जरी स्वतंत्रपणे मृत्यूचे तत्त्वज्ञान सांगितले नसले तरी काही मृत्युलेखांमधून त्यांचे मृत्यूविषयीचे तत्त्वज्ञान निवेदनाच्या ओघात आले आहे व काही व्यक्तींच्या मृत्यूची चिकित्साही केली आहे. साने गुरुजींवरील 'मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी' या मृत्युलेखामध्ये गुरुजींच्या मृत्यूविषयक विचारांच्या अनुषंगाने अत्र्यांचेही मृत्यूविषयक तत्त्वज्ञान व्यक्त होते. "मरणात खरोखर जग जगते.', असली मरणावर नुसत्या शब्दांची काव्ये लिहिणारे कवी ह्या महाराष्ट्रात आजवर पुष्कळ होऊन गेले असतील. पण 'आपुले मरण स्वतःच्या डोळयांनी' पाहणारे तुकारामासारखे आणि मरणाच्या मळयात दोन्ही हात घालून त्यांचे कडकडून चुंबन घेणारे साने गुरुजींसारखे महाकवी शतकाशतकांमधून एकदाच जन्माला येतो."[15] अत्र्यांच्या या वक्तव्यामधून त्यांच्या मनातील केवळ भावगांभीर्य व्यक्त होत नाही तर 'मृत्यू' हे जीवनातील अंतिम सत्य आहे आणि स्वतःच्या मरणाला स्वतः होऊन सामोरे जाण्याचे धैर्य फक्त साक्षात्कारी व्यक्तींमध्येच अस्ते आणि अशा साक्षात्कारी व्यक्ती फारच दुर्मिळ असतात. अशा प्रकारचे मृत्यूविषयीचे चिंतन, तत्त्वज्ञान येते. तसेच समाजातील जातीयता, प्रांतीय मतभेद, ध्येयशून्यता यामुळे शेवटी गुरुजी हताश झाले आणि अशा समाजात जिवंत राहणे त्यांच्या मानवतावादी स्वभावाला न रुचल्यामुळे त्यांनी मृत्यूच्या आगीत स्वतः होऊन उडी मारली. अशी त्यांच्या मरणाची चिकित्साही अत्रे करतात.

'त्या अर्ध्या तिकिटासाठी' या मुंबईपासून दहा अकरा मैलांच्या अंतरावर समुद्रामध्ये 'रामदास' बोट अकस्मात बुडून झालेल्या अपघाताविषयी लिहिलेल्या मृत्युलेखात अत्र्यांनी सर्वत्र मृत्यूचा आणि

काळाचा राक्षसीपणा, कपटीपणा, क्रौर्य, भ्याडपणा, दुष्टपणा, नीचपणाविषयी भाष्य केले असून परिच्छेदाच्या परिच्छेद ते मृत्यूविषयीचे तत्वज्ञानच सांगताना दिसतात. उदाहरणार्थ, "अनेक मृत्यू पाहिलेल्या माणसांचे धैर्य वाढत जाते असे म्हणतात. मृत्यू हा माणसाला शूर बनवितो. पण खुद्द मृत्यूच्या बाबतीत मात्र तसे झालेले काही दिसत नाही. अनेकांची मरणे अनुभवूनही मृत्यूच्या अंगात तिळमात्रही धैर्य किंवा शौर्य निर्माण झालेले नाही. उलट तो जास्तच भ्याड आणि दुष्ट झालेला आहे[16] ........ हे मृत्यूविषयीचे तत्वज्ञान अत्र्यांचेच आहे. त्याप्रमाणे 'सुर्यास्त' मधील 'अखेरचा प्रणिपत', 'अनंताची हाक' आणि 'अखेरची इच्छा' ह्या मृत्युलेखांमधून नेहरुंच्या मृत्यूविषयक विचारांच्या अनुषंगाने अत्र्यांनी त्यांचेही मृत्यूविषयीचे चिंतन, तत्वज्ञान व्यक्त केले आहे. 'अखेरचा प्रणिपात' ह्या लेखामध्ये नेहरुंचे गांधीजींच्या मृत्यूवरील व स्वतःच्या मृत्यूचे हृदयस्पर्शी काव्यमय विचार सांगून शेवटी "स्मरणानेच माणसाच्या मरणाला खरे मोल येते"[17] असा मृत्यूविषयीचा विचार सहजपणे सांगून जातात. 'अनंताची हाक' ह्या लेखामध्ये जरी रॉबर्ट फॉस्ट ह्या अमेरिकन कवीच्या चार ओळींच्या कवितेचे भाषांतर असले तरी त्याचे स्वरुप भाषांतराचे नसून छोटयाशा भावपूर्ण लेखाचे आहे. कोणत्याही व्यक्तीला लागू होऊ शकतील असे विचार अत्रे येथे व्यक्त करतात. आयुष्याच्या सायंकाळीची चाहूल जेंव्हा मनुष्याला लागते तेंव्हा त्याचे मन खूपच सैरभैर होते. कारण आता त्याला मृत्यूला सामोरे जायचे असते. ज्या जीवनाबद्दलची त्याने अनेक स्वप्ने पाहिलेली असतात ती साकारणे अजून शिल्लक असताना जीवन सोडून जाणे ही कल्पना माणसाच्या मनाला बेचैन करणारी असते. हे रॉबर्ट फॉस्टच्या कवितेआधारे अत्र्यांनी मृत्यूविषयीचे केलेले विवेचन म्हणजे त्यांचे मृत्युविषयक चिंतनच आहे. 'अखेरची इच्छा' या लेखातही ते नेहरुंच्या मृत्युपत्रातील नेहरुंच्या मृत्युविषयक विचारांचे विश्लेषण करतात.

शास्त्रीजीवरील 'इतका लहान एवढा महान' ह्या संग्रहातील 'अस्थिविसर्जन' प्रसंगाच्या निमित्ताने ते आत्मा, शरीर काळ, या विषयीचे तत्वज्ञान सांगून माणसाची कीर्ती आणि त्याने केलेले 'कार्य' यावर मृत्यूला कधीही विजय मिळवता येत नाही. अशा आशयाचे विवेचन करुन शास्त्रीजींच्या स्मरणीय कार्यावर भाष्य करतात.

अशा प्रकारे अत्र्यांनी जरी स्वतंत्रपणे मृत्यूचे तत्वज्ञान सांगितले नसले तरी काही निवडक मृत्युलेखांच्या लेखनामध्ये या ना त्या कारणाने ते येऊन गेले आहे. काही ठिकाणी हे तत्वज्ञान ते विस्ताराने सांगतात तर काही ठिकाणी एखाद्या दुस-या ओळीत सांगतात. तरी देखील त्यामागे अत्र्यांचे खोल चिंतन आहे हे मान्य करावेच लागेल.

एस. एस. भोसले यांच्या विधानातील दुसरा भाग म्हणजे 'अत्र्यांचे हळवे कविमन मरण–चिकित्सा करायला धजलेले नाही'. अत्र्यांच्या मृत्युलेख लेखनाबद्दल अशा प्रकारचे विधान करीत असताना मृत्युलेखाच्या लेखनात मरणचिकित्सेची आवश्यकता आहे का ? व जर आवश्यक असेल तर ती केली आहे का ? हे तपासून पाहणे क्रमप्राप्त आहे. मृत्युलेख हा वाङ्.मय प्रकार मृत व्यक्तीविषयी स्मरण करणे या भूमिकेतून निर्माण झाला आहे. त्या अनुषंगाने व्यक्तिविशिष्टता, जीवन विषयक जाणिवा, लेखकाची भावनिकता. संवदेनशीलता, अनुभूतीची अभिव्यक्ती, समाजाभिमुखता, व्यक्तीविषयीची वैयक्तिक हळहळ, आठवणी, करुणरम्यता यांचे चित्रण मृत्युलेखात येणे आवश्यक आहे. व ते अत्रे लिखित मृत्युलेखांमध्ये आल्यामुळेच त्यांचे मृत्युलेख लेखन यशस्वी व श्रेष्ठ दर्जाचे झाले आहे. मात्र मरणचिकित्सा मृत्युलेखात यायला हवी असे म्हणणे तितकेसे योग्य होणार नाही. कारण मृत्यूची चिकित्सा करणे हे काही मृत्युलेख लेखनामागील प्रयोजन नव्हे. मरणचिकित्सा हा पोलिसी खाक्या झाला. आणि अत्रे काही पोलीस नाहीत. ते कलावंत आहेत. मृत्युलेखात भावनिकतेच्या व व्यक्तीला न्याय देत असताना व्यक्तीचा मृत्यू जर तिच्यावर झालेल्या काही सामाजिक व इतर बाबतच्या अन्यायामुळे झाला असेल तर त्याची काही अंशी चिकित्सा मृत्युलेख लेखनात करणे योग्य ठरेल. पण ह्या चिकित्सेस प्राधान्य देणे मात्र योग्य ठरणार नाही. अत्र्यांना जेथे ही चिकित्सा औचित्यपूर्ण वाटली तेथे त्यांनी केली आहे व त्यामुळे लेखन यशस्वी झाले आहे. उदा. 'दुष्ट लोकांनी काकांना मारले हो' ह्या ज्ञानप्रकाशचे माजी संपादक काकासाहेब लिमये यांच्यावरील मृत्युलेखात अत्र्यांनी काकासाहेबांच्या मृत्यूची अप्रत्यक्ष पद्धतीने चिकित्साच केली आहे. त्यांचा मृत्यू पक्षघातामुळे झाला आणि त्यांना पक्षाघाताचा झटका येण्यास आणि पर्यायाने त्यांच्या मृत्यूस भारत सेवक समाजच कसा जबाबदार आहे याची चिकित्सा ते या लेखात करताना दिसतात. व काकासाहेबांवरील अन्यायी प्रवृत्तींवर ते घणाघाती प्रहार करतात. मात्र न्यायमूर्ती बावडेकर यांच्यावरील मृत्युलेखास जरी आरंभी भावनिक स्पर्श असला तरी लेखातील बराचसा भाग बावडेकरांच्या संशयास्पद अपघाती मृत्यूच्या चिकित्सेवरच खर्ची पडला आहे. त्यामुळे व्यक्तित्त्व दर्शनाकडे बरेचसे दुर्लक्ष झाल्याने मृत्युलेखाच्या यशास बाधा येते. तसेच 'मा. सा. कन्नमवार' यांच्या मृत्यूची चिकित्सा करताना "महाराष्ट्र राज्यासारख्या एका महान राज्याच्या जबाबदारीचा प्रचंड बोजा कन्नमवारांना यांच्या ह्या वार्धक्यात झेपण्यासारखा नव्हता. म्हणूनच त्याच्या धकाधकीने आणि दगदगीने त्यांना आकस्मिक मृत्यू प्राप्त झाला असावा असे आमचे निदान आहे"[18] अशी ते थोडक्यात चिकित्सा करतात. 'पानशेत

हुतात्म्यांना सामुदायिक श्रद्धांजली वाहत असताना पानशेतच्या मानवनिर्मित जलप्रलयास जबाबदार असणारे सरकारी अधिकारी, मंत्री यांच्यावर ते टीकास्त्र चालवतात. धरण फुटण्यास कारणीभूत असणा–या बाबींची चिकित्सा करुन ही आपत्ती टाळता आली असती हे साधार स्पष्ट करतात आणि शासनाच्या गाफीलपणामुळे व गलथान कारभारामुळेच ही आपत्ती ओढवली या निष्कर्षावर येतात.

या दृष्टीने विचार करता मृत्युलेखात मरणचिकित्सेची जर आवश्यकता असेल तरच ती करणे काहीसे उचति ठरेल अन्यथा विनाकारण जर मरणचिकित्सेवर भर दिल्यास मृत्युलेखात आवश्यक असणा–या इतर बाबींच्या अभिव्यक्तीकडे दुर्लक्ष झाल्याने मृत्युलेखाच्या यशास बाधा येते. हे तारतम्य अत्रे बाळगतात. त्यामुळे त्यांचे लेखन यशस्वी होते. जेथे हे तारतम्य सुटते तेथे मृत्युलेख फसतो.

वरील सर्व बाबींच्या अनुषंगाने विचार करता अत्र्यांच्या मृत्युलेख लेखनात जणु काही दर्पणात प्रतिबिंब दिसावे तसे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि कर्तृत्त्वाचे प्रतिबिंब दिसते. जुन्या पिढीतील कित्येक महनीय व्यक्तींची ओळख नव्या पिढीला त्यांच्या वरील मृत्युलेखांमधून पटते. अत्र्यांच्या शब्दांना असलेल्या भावनिक ओलाव्यातून त्यांचे शब्द वाचकांच्या अंतःकरणाला जाऊन भिडतात. त्यामागे त्यांचे परिपक्व, चिंतनशील व्यक्तिमत्त्व उभे आहे. ते व्यक्तीच्या भावजीवनावर प्रकाश टाकत टाकतच कर्तृत्त्वावरही बोलतात. त्यामुळे मृत्युलेख ज्या व्यक्तीवर आहे त्या व्यक्तिमत्त्वाचे एकांगी चित्रण न होता अनेकांगी होते. त्यांचा व्यक्तीशी असणारा अंतस्थ, हृदयस्थ सूर जाणवत राहतो. व्यक्तीच्या जीवनाचा एकंदरीत जीवनव्यापी आढावा ते अकृत्रिम पद्धतीने घेतात. व्यक्तीच्या जीवनाचे झालेले सार्थक अथवा अपुरेपणा, निरर्थक जीवनही ते अर्थपूर्णरीत्या बोलके करुन मनाला भिडवतात. व्यक्तीच्या जीवनातील नेमके अनुभव त्यांच्या विशिष्ट छटा व भावछटा अत्रे सहजपणे टिपतात. त्यांना व्यक्तीविषयी जशी निष्ठा आहे तसेच त्यांचे असणारे मतभेदही ते प्रामाणिकपणे सांगतात.

अत्र्यांच्या व्यक्तिबद्‌दलच्या गहन चिंतनातून अजाण रसिकालाही व्यक्तीचा जवळून परिचय होतो. त्यांचे मृत्युलेख म्हणजे त्यांच्या व्यक्तीविषयीच्या प्रदीर्घ चिंतनाचा भावानुभूतीच्या रंगाचा, उदात्ततेता, करुणरम्यतेचा परिपाक होय. अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व भावनिकतेचा स्पर्श या मृत्युलेखांना झाल्यामुळेच त्याना नितांत रमणीयता प्राप्त होऊन जिवंतपणा आला आहे. हे लेखन जरी औपचारिकतेतून झालेले असले तरीदेखील त्यातील वाङ्‌मयीन गुणवैशिष्टयांमुळे करुणरम्य सौंदर्याचा प्रत्यय त्यातून येतो. अत्र्यांच्या व्यक्तीबद्‌दलच्या उस्फूर्त अविष्कारामधून त्यांच्या अनुभूतीचे विविध रंग अनुभवास येतात. हे लेखन त्यांच्या अनुभूतीचा भावोत्कट उद्‌गार आहे. त्यात त्यांचेही व्यक्तिमत्त्व मिसळल्याने अत्र्यांचे विचार मते चिंतन अनभव आठवणी यांचे दर्शन घडले. तसेच

मृत्युलेखांमधून त्या त्या व्यक्तींच्या समकालीन जीवनप्रवाहाशी सहजपणे संबंध येतो. त्यांचे आत्मभान महत्त्वपूर्ण आहे. ते व्यक्तीचे अस्तित्व व व्यक्तित्त्व यासंबंधी गुणगान करतात तेंव्हा सहजपणे व्यक्तीला मोठेपणा प्राप्त होते. मानवी जीवनातील नेहमीच्या प्रसंगांनाही अत्र्यांच्या चिंतनशीलतेची जोड मिळाली की, ते प्रसंग हृद्य, अंतःकरणाला हात घालणारे होतात. त्यातून जीवन संदेशाचे प्रत्यंतर येते. कारण जीवनानुभवाची प्रगल्भ जाणीव त्यांना आहे.

अत्र्यांची व्यक्ति-पूजकता, गुणग्राहकता, व्यक्तिनिष्ठा, रसिकता, व्यासंग, जीवनविषयक प्रगल्भता, व्यक्तीबद्दलची आत्मियता, खास शैलीत मृत्युलेख खुलविण्याचे त्यांचे म्हणून कसब, यामुळे ह्या मृत्युलेखांमधून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा काही अंशी तरी शोध ते घेतात.

अत्र्यांची भाषा संवाद करावा तशी आहे. कधी कधी ते स्वतःशीच आत्ममग्न होऊन बोलताहेत असे वाटते. त्यांच्या शब्दांना प्रवाहीपणा आहे. निखळपणा आहे. पारदर्शी साधेपणा आहे. अत्रे एका अर्थाने हृदयसंवाद करतात. त्यामुळे मृत्युलेखांच्या माध्यमातून त्यांनी मृत्युलेखांमधील व्यक्तींना वाड्.मयीन अमरत्व व महत्त्व प्राप्त करुन दिले आहे असे म्हटल्यास काहीच वावगे होणार नाही.

वरील दृष्टिकोनातून मृत्युलेखकार म्हणून अत्र्यांचा विचार करता त्यांचे 'मृत्युलेख लेखक' म्हणून स्थान बरेचसे उच्चतम व उजवे ठरते. ते श्रेष्ठ दर्जाचे मृत्युलेखकार ठरतात.

*** अत्र्यांच्या मृत्युलेखांतील गुणदोषांची पाहणी –**

मृत्युलेखाचे लेखन ही कला आहे. कारण एकाच वेळी भावनेला आणि व्यक्तीविषयीच्या सत्य परिस्थितीला आव्हान करणारा हा वाड्.मय प्रकार असल्यामुळे त्याचे यश बरेचसे लेखकाच्या सामर्थ्यावर अवलंबून असते. लेखक जर भावनेच्या आहारी जाऊन लेखन करु लागला तर तो वाहवत जाण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे जरी हा वाड्.मय प्रकार भावनेला अधिक आव्हान करणारा असला तरी तो लेखकाने तारतम्याने हाताळणे आवश्यक असते. अन्यथा त्या लेखनात व्यक्तिदर्शनातील सदोषता येण्याची शक्यता जास्त असते. मृत व्यक्तीवर यशस्वी मृत्युलेख लिहिण्याच्या बाबतीत आचार्य अत्र्यांची विशेष ख्याती आहे. ह्या पार्श्वभूमीवर अत्रे लिखित मृत्युलेखांमधील गुणदोषांची पाहणी करणे महत्त्वाचे ठरेल.

*** अत्रे लिखित मृत्युलेखांमध्ये आढळणारे गुण –**

अत्रे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे सूक्ष्म अवलोकन करतात. त्यांचा ज्या व्यक्तीशी संबंध आहे त्या व्यक्तीच्या मृत्युनंतर तिच्यावर मृत्युलेख लिहित असताना तिच्या शरीर प्रकृतीचे, पोषाखाचे,

स्वभावाचे, सवयींचे, लकबींचे वर्णन ते करतात. हे त्यांना सूक्ष्म अवलोकनामुळेच शक्य होते. व्यक्तीचे बाह्यचित्रण तर ते करतातच पण तिच्या स्वभावातील बारीकसारीक बारकावेदेखील ते टिपतात. इतकी त्यांची स्मरणशक्ती तल्लख आहे. त्या व्यक्तीच्या जीवनाशी संबंधित घटना प्रसंगांचेही त्यांचे सूक्ष्म अवलोकन असल्यामुळे चित्रमय शैलीत ते त्यांचे निवेदन करतात. या अनुषंगाने लेखनात जरी तपशिलपूर्णता आली तरी ती कोरडी वाटत नाही. तिला त्यांच्या भावानुभवाचे रंग प्राप्त झाल्यामुळे तिच्यात वाचनीयता व रमणीयता येते. ज्या व्यक्तीशी अत्र्यांचा प्रत्यक्षात संबंध नाही तिच्या स्वभावाबद्दलचीही अत्र्यांना माहिती आहे. तिच्या जीवनातील त्यांची काही ऐकीव माहिती प्रसंग यांचेही ते चित्रण करतात. तिच्या खाण्यापिण्याच्या सवयी, वेळा इथपासून त्यांच्या चालण्याबोलण्याचे ते वर्णन करतात तेंव्हा त्या व्यक्तीविषयीची एवढी माहिती अत्र्यांनी कशी मिळवली असेल याचे आश्चर्य वाटते. याचे उदाहरण घ्यायचे झाले तर, शास्त्री न्याहारीला दोन संत्री किंवा मोसंबी खात, जेवणात पावाचे दोन तुकडे आणि दोन किंवा तीन भाज्या खात. किंवा 'चर्चिल' ची दिनचर्याही त्यांना माहित आहे. त्याच्याही खाण्यापिण्याचे, उठण्या बसण्याचे, लेखनवाचनाच्या सवयींचे सूक्ष्म वर्णन ते करतात. अर्थात हे सारे त्यांनी परिश्रमपूर्वक माहित करुन घेतल्यामुळेच व्यक्तीविषयक बारकाव्यांची तपशीलपूर्णता ते मृत्युलेखांच्या लेखनात देऊ शकतात. हा त्यांचा लेखनातील महत्त्वाचा गुण होय.

अत्र्यांच्या मृत्युलेख लेखनाच्या अभिव्यक्तीत वैविध्य आढळते. कधी ते आठवणींच्या स्वरुपात निवेदन करतात. बव्हंशी लेखनात त्यांच्या वक्तृत्वाची छटा येते. कधी कथासदृश पद्धतीने संवाद करताना घटनावर्णने, प्रसंगवर्णने, व्यक्तीवर्णने, स्थलवर्णने यांना ते महत्त्व देतात. कधी हे लेखन स्वभावचित्रणाच्या, व्यक्तिचित्राच्या अंगाने होते. तर कधी काव्यमय पद्धतीने व्यक्तिदर्शन घडवतात. त्या व्यक्तीच्या जीवनातून त्यांना गवसलेला जीवनार्थ ते मोठया आत्मीयतेने सांगतात. व्यक्तीची वैचारिकता, सामाजिकता, कार्य यांचे मूल्यमापन करुनही मृत्युलेख सजवतात. बव्हंशी मृत्युलेखांमधून त्यांच्या भावविवशतेचा प्रत्यय येतो पण केवळ भाव-विवशतेमुळे मृत्युलेख फुलतो असे मात्र म्हणता येणार नाही. कारण काही स्मृतिपर लेख भावविवशतेचा स्पर्श नसतानाही यशस्वी झाले आहेत. त्यामुळे भावविवशता असली आणि नसली तरीही ते यशस्वी मृत्युलेख लिहू शकतात. अशा प्रकारचे अभिव्यक्तीतील वैविध्य ह्या लेखनात असल्यामुळे तेदेखील त्यांच्या लेखनामधील गुणवैशिष्ट्य ठरते.

अत्र्यांचे अनुभवविश्व व्यापक आहे. फक्त मृत्युलेखांच्या बाबतीत जरी विचार करायचा झाला तरी नानाविध क्षेत्रातील नानाविध स्वभावांच्या माणसांवर अत्र्यांनी मृत्युलेख लिहिले आहेत. याचे कारण म्हणजे अत्र्यांचे जीवनच अनेक वळणांचे आहे. त्यांनी जीवनात अनेक क्षेत्रे पादाक्रांत केल्यामुळे निरनिराळया क्षेत्रातील अनेक व्यक्तींशी त्यांचा संबंध आला. त्यांचे व्यक्तिमत्त्व समाजाभिमुख असल्यामुळे निरनिराळया प्रसंगी त्यांना अनेक माणसे भेटली आणि त्यांच्याशी त्यांचे भावबंध निर्माण झाले. त्यांच्या गुणग्राहकतेमुळे जेवढी माणसे त्यांच्याजवळ आली तेवढीच त्यांच्या परखडपणामुळे दुरावली देखील. त्यामुळे काही व्यक्तींशी त्यांचे कायमचे स्नेह बंध जुळून आले तर काही व्यक्तींशी वरचेवर या ना त्या कारणाने खटके उडत राहिले. ज्या व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व अत्र्यांना मनापासून भावले त्या व्यक्ती निवर्तल्यावर तर त्यांनी त्यांच्यावर समरसून मृत्युलेखांचे लेखन केलेच पण ज्यांच्याशी त्यांचे आयुष्यभर जमले नाही त्या व्यक्ती निवर्तल्यावरही त्यांनी त्यांचे गुण, कर्तृत्व यांचा गौरव केला आणि ज्याबाबत त्यांचे त्या व्यक्तींशी मतभेद झाले त्याची प्रांजळपणे कबुली देऊन त्यांच्या दोषांचे दिग्दर्शनही त्यांनी केले. अत्र्यांचे व्यापक अनुभवविश्व हेही त्यांच्या मृत्युलेख लेखनामधील एक गुणवैशिष्टय होय.

व्यक्ती जीवनाकडे पाहण्याचा काव्यमय दृष्टिकोन व भावगीतांतील उत्कटता, तरलता अत्र्यांच्या मृत्युलेख लेखनात आहे. त्यांनी त्या व्यक्तीच्या मृत्यूचा घेतलेला दुःखद अनुभव ते अत्युत्कटपणे सांगतात. त्यांचा उत्कटपणा शीगेला पोहचतो. त्या व्यक्तीविषयी ते आत्ममग्नपणे भाष्य करीत राहतात तेंव्हा त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील भावछटा ते फुलवत नेतात. ते व्यक्तीला विशेषणे लाऊ लागले की देहभान हरवून विशेषणे लावत जातात तरीही त्यात कोठे कृत्रिमता दिसत नाही. अनुप्रासात्मक शैलीमुळे मृत्युलेख लेखनात लयदारपणा, नादमयता, प्रवाहीपणा व उठावदारपणा येतो. ते व्यक्तीच्या जीवनातील काव्याचा आणि कार्याचा विवेचक शोध घेताना भावस्पंदने व्यक्त होत जातात. उत्कटता, भव्यता आणि उदात्तता यामुळे मृत्युलेखामध्ये स्वाभाविकपणे काव्यात्मता येते. भावगीतातील भावना जशी काळजाला भिडते तसे काळजाला भिडण्याचे सामर्थ्य अत्रे लिखित मृत्युलेखांमध्ये आहे. मृत्युलेख अभ्यासताना अत्रे त्या व्यक्तीच्या जीवनाचे भावगीत गात आहेत असा अनुभव येतो. अशा प्रकारे काव्यात्मता व भावगीतात्मकता हे अत्र्यांच्या मृत्युलेखांचे एक गुणवैशिष्टय होय.

अत्रे मृत्युलेख लिहित असताना ते त्या व्यक्तीशी एकरुप होऊन लेखन करतात. तिच्याबद्दलचा निखळ जिव्हाळा, त्यांना जाणवलेले तिच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू, तिचे कार्यक्षेत्र,

वेगळेपण यांचे लालित्यपूर्ण दर्शन ते घडवतात. घटनाप्राचुर्य, अनुभव कथन आणि आठवणींना प्राधान्य देऊन लेखन केल्यामुळे स्वाभाविकपणे त्या व्यक्तीविषयीचा अत्र्यांचा दृष्टिकोण अनुभवास येतो. व्यक्तीचे बाह्यचित्रण करीत असताना ते तिच्या शरीरप्रकृतीचे, पोषाखाचे व चालण्या बोलण्यातील लकबींचेही वर्णन करतात. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील बाह्य व्यक्तित्त्वाबरोबरच तिची अंतर्गत वैशिष्टयेही ते नमूद करतात. यात तिच्या खाण्यापिण्याची आवडी निवडींपासून तिची वैचारिकता, मानसिकता, स्वभाव, यांचे दर्शन घडवत असताना तिच्या जीवनातील विविध स्तर, विविध कार्यक्षेत्रे, सामाजिक परिस्थिती, तिचे गुण दोष यांचे दिग्दर्शन ते करतात. तिचे जीवनविषयक तत्त्वज्ञान, दृष्टिकोण, सामाजिक – राजकीय विचारसरणी, लोकप्रियता असे त्या व्यक्तिमत्त्वाचे नाना पदर ते वेधकपणे चित्रित करतात. त्यामुळे व्यक्तिदर्शनातील वेधकपणा हे या लेखनाचे गुणवैशिष्टय होय.

वृत्तपत्रीय लेखन म्हणजे प्रसंगोपात घातला जाणारा रतीब. त्यामुळेच आजचे वर्तमानपत्र उद्याची रद्दी होत असते. मात्र अत्र्यांइतकी प्रासादिकता वृत्तपत्रीय लेखनात इतर कोठेही आढळत नाही. हे लेखन जरी करुणरम्य असले तरीदेखील अत्र्यांच्या प्रासादिक शैलीमुळे त्यात लालित्य येते. गोडवा येतो. रसपूर्णता व भावोत्कटतेमुळे लेखनात विलोभनीयता येते. त्यांच्या जवळ वास्तवाचे भान असणारा कल्पनाविलास असल्यामुळे व्यक्तीच्या जीवनातील प्रसंगांना हलविण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ आहे. त्यामुळे मृत्युलेख म्हणजे अत्र्यांचा हृदय अविष्कार वाटतो. या लेखनात कोठेही रुक्षता, रटाळपणा येत नाही. भावपूर्णता, माधुर्य, रसपूर्णता यामुळे लेखनात काव्यमयता येते. अत्र्यांच्या लेखनशैलीतील प्रासादिकतेमुळेच हे भावसौंदर्य लेखांना प्राप्त होते. त्यामुळे प्रासादिकता हे त्यांचे गुणवैशिष्टय होय.

अत्र्यांचा मृत्युलेख लेखनाविषयीचा दृष्टिकोन संपन्न आहे. त्यात कारुण्यरम्यता आहे. तसाच धीरगंभीरपणा आहे. उपहासगर्भता व सडेतोडपणाही आहे. वेधकता आहे.त्यांना जीवनानुभवाची प्रगल्भ जाणीव आहे. तरल स्नेहार्द्रतेचा ओलावा आहे. करुणरम्य सौंदर्याचा प्रत्यय या लेखनात येतो. निवेदनाच्या ओघातच कित्येक सुभाषितांची निर्मिती त्यांच्याकडून होते. त्यांचे व्यापक अनुभव विश्व, सूक्ष्म निरीक्षण शक्ती, व्यासंग, गुणग्राहकता, बहिर्मुखता, परखडपणा, देशनिष्ठा, महाराष्ट्र व मराठी भाषेबद्दलचे प्रेम, व्यक्तिगत भावबंध, जिव्हाळा, आदर, संवेदनशीलता, मार्मिकता आस्थेवाईकपणा, आत्मीयता, प्रगल्भता, प्रसंगनिष्ठ कोमलता व कणखरपणा, कृतज्ञता, प्रेम, भक्ती, अभिमान, समाजनिष्ठा, इतिहासाकडे डोळसपणे पाहण्याची दृष्टी, साधुसंतांवरील श्रद्धा, यामुळे

अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वात असणा-या संपन्नतेचे प्रतिबिंब त्यांनी लिहिलेल्या मृत्युलेखात पडते. त्यामुळे या लेखनात त्या व्यक्तीविषयीचे अत्र्यांचे विचार, अनुभव, मतमतांतरे कशा प्रकारची असावीत याची साक्ष पटते. अत्र्यांचे संपन्न व्यक्तिमत्त्व हे गुणवैशिष्टय मृत्युलेखांमध्येही आढळते.

अत्र्यांमधील समाज शिक्षकाचे, प्रबोधन काराचे दर्शन या लेखनात घडते. ते शिक्षक असल्यामुळे त्यांची वृत्ती साहजिकच समजावून घेण्याची व देण्याची आहे. मृत्युलेखाचे लेखन करीत असताना आधी ते गेलेली व्यक्ती स्वतः समजावून घेतात आणि मग ते वाचकांना समजावून देतात. ही त्यांची शिक्षकी वृत्ती त्यांच्यामधील पत्रकारामध्येही दिसून येते. पत्रकार हा समाजशिक्षक असतो. त्यामुळे समाजसाधक प्रवृत्तींचा गवगवा, उदोउदो करणे आणि समाजविघातक प्रवृत्तींचा सडेतोडपणे समाचार घेणे त्याचे परमकर्तव्य असत. मृत्युलेखांच्या लेखनामध्येही त्यांचा हा दृष्टिकोण स्पष्ट होतो. समाजातील कोणत्याही प्रवृत्तींचा धक्का अत्र्यांच्या स्वाभिमानाला किंवा त्यांच्या पूजनीयतेला लागला तर ते लगेच फणा काढतात. शत्रूच्याही गुणांचे कौतुक करण्याइतका अत्र्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. व्यक्तीमधील गुणांबद्दल त्यांना आदर आहे आणि अवगुणांबद्दल केवळ अनादर नाही तर तिटकारा आहे. अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हा गुण समाजाच्या दृष्टीने समाजशिक्षकाचा आहे. ते फक्त व्यक्तीमधीलच दोषांवर टीका करतात असे नाही तर समाजावरही ते टीका करतात. 'दयेचे काव्य – गाय' सारख्या लेखातून त्यांनी दुष्काळात गाई वांद्रयाच्या कसाईखान्याची वाट चालतानाचे हृदयद्रावक दृश्य पाहिले आणि समाजाच्या ह्या अन्यायी प्रवृत्तीवर कृतघ्नतेवर या लेखातून प्रहार केले. येथे त्यांना पशुतील मानवतेचे व मानवतील पशुत्वाचे दर्शन घडते. अशा प्रकारचे अत्र्यांमधील समाजशिक्षकाचे दर्शन त्यांनी लिहिलेल्या ब-याच अग्रलेखांप्रमाणे मृत्युलेखांमध्येही आढळते. त्याच्या व्यक्तिमत्त्वातील हा गुण मृत्युलेखांच्या लेखनातही दिसून येतो.

*** अत्रे लिखित मृत्युलेखांमध्ये आढळणारे दोष –**

अत्रे जसे गुणग्राहक आहेत तसेच परखड टीकाकारही आहेत. देशविदेशाच्या सीमा ओलांडून ते व्यक्तीच्या गुणांचे कौतुक करताना आखडता हात घेत नाहीत. मात्र त्यांची स्वतःची जी राजकीय, वाड्.मयीन सामाजिक विचारसरणी आहे. त्या विचारसरणीला जेंव्हा एखाद्या व्यक्तीमुळे धक्का लागतो तेंव्हा ते तिच्यावर सडेतोडपणे टीका करीत असताना त्यांच्या शैलीत खवचटपणा येतो आणि ते त्या व्यक्तीविषयी जी विधाने करतात त्यात कधी कधी ग्राम्यताही येते. उदाहरणार्थ चर्चिलच्या गुणांचे कौतुक करीत असताना ते "चर्चिल हा एक अद्भुत आदर्श आहे. त्याच्या बुटाचे सुद्धा पाणी

पिण्याची मोरारजी देसाईंची लायकी नाही"[19] असे वक्तव्य ते काहीशा खवचटपणे करतात. त्यामळे कधी कधी त्यांची लेखणी खवचटपणामुळे सैल सुटते. हा त्यांच्या लेखणीचा दोष होय. परंतु अत्रे ह्या व्यक्तिमत्त्वाचाच तो स्वभावधर्म असल्याने अत्र्यांना ही गोष्ट टाळणे अवघड जाते.

अत्रे मृत्युलेख लिहित असताना कधीकधी त्यांच्या लेखनात पुनरावृत्तीचा दोष येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरु, लाल बहादूर शास्त्री, यांच्याविषयी जे मालिकांच्या स्वरुपात मृत्युलेख लेखन केले आहे त्यामध्येही त्यांच्या कार्याच्या, स्वभावाच्या अनुषंगाने काही लेखांमध्ये पुनरावृत्ती झाल्याने तोचतोपणा जाणवतो. परंतु हा दोष हे लेखन वृत्तपत्रीय स्वरुपाचे असल्यामुळे आला आहे. त्यामुळे त्याकडे काहीसे दुर्लक्ष करणे इष्ट ठरेल.

सारांश,

अत्र्यांचा मृत्युलेखकार म्हणून विचार करीत असताना त्यांचे मृत्युलेखकार म्हणून स्थान श्रेष्ठ दर्जाचे ठरते. तसेच त्यांच्या मृत्युलेख लेखनामधील गुणदोषांची पाहणी करीत असताना काही थोडेफार दोष आढळत असले तरीदेखील गुणांच्या दृष्टीने ते 'चंद्रावरील डागा' प्रमागे वाटतात.

वरील विवेचनाआधारे आपणास खालील निष्कर्ष काढता येतील.

1. अत्र्यांच्या स्वभावात मूळापासून कारुण्याचे स्वाभाविक आकर्षण असल्यामुळे 'मृत्युलेख' या वाङ्मय प्रकारात त्यांच्या मूळ स्वभावधर्माचे दर्शन घडते.

2. अत्रे लिखित मृत्युलेखांमधून अत्र्यांची शैली, स्वभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील काही पैलूंचे स्वाभाविकपणे प्रत्यंतर येते.

3. अत्र्यांच्या व्यक्तिमत्त्वावर असणारा काही व्यक्तींचा प्रभाव या लेखनातून स्पष्ट होतो.

4. अत्र्यांनी त्यांच्या मृत्युलेख लेखनाविषयीचा दृष्टिकोन त्यांच्या वाङ्मयीन आत्मशोधनातून व इतर काही स्फुट लेखनातून व्यक्त केला आहे. त्याद्वारे त्यांचा 'मृत्युलेख' विषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो.

5. मृत्युलेखातून अत्रे व्यक्तीच्या जीवनाचे यथोचित मूल्यमापन करताना दिसतात.

6. त्यांच्या लेखनशैलीवर जरी गडकऱ्यांचा संस्कार असला तरी त्यांनी नक्कल केलेली नसून त्यांची स्वतःची लेखनशैली परिश्रमपूर्वक घटवलेली आहे.

7. काही मृत्युलेखांमधून निवेदनाच्या ओघात अत्र्यांनी 'मृत्युविषयक तत्त्वज्ञान' ही विशद केले आहे.

8. अत्रे लिखित मृत्युलेखांच्या गुणदोषांची पाहणी करीत असताना गुणांच्या तुलनेत दोषांचे प्रमाण अल्प आहे.

9. अत्र्यांचा मृत्युलेखकार म्हणून वेगवेगळया अंगानी अभ्यास करता त्यांचे मृत्युलेखकार म्हणून स्थान श्रेष्ठ ठरते. त्यांची मृत्युलेखकार म्हणून ख्याती आहेच पण एक सामर्थ्यशाली प्रतिभावंत म्हणून त्यांची ती योग्यताच आहे.

10. अत्रे शिक्षक व पत्रकार म्हणून समाजशिक्षक व प्रबोधनकारही आहेत.

*****

## * तळटीपा *

1. प्र. के. अत्रे : 'मी कसा झालो' पाचवी आवृत्ती : परचुरे : मुंबई : 1987 : पृष्ठ 39.
2. ल. रा. नसिराबादकर : 'आचार्य अत्रे साहित्य दर्शन : प्रथमावृत्ती : फडके प्रकाशन : कोल्हापूर : 1976 पृष्ठ 193.
3. प्र. के. अत्रे : 'समाधीवरील अश्रू' तिसरी आवृत्ती : परचुरे : मुंबई : 1991 : पृष्ठः119
4. प्र. के. अत्रे 'हुंदके' : दुयरी आवृत्ती : परचुरे : मुंबई : 1989 : पृष्ठ 104.
5. तत्रैव : पृष्ठ 184.
6. तत्रैव : पृष्ठ 185.
7. प्र. के. अत्रे : 'समाधीवरील अश्रू' : तिसरी आवृत्ती : परचुरे : मुंबई : 1991 : पृष्ठ : मलपृष्ठावरील अत्र्यांचे मृत्युलेख विषयक विवेचन.
8. एस. एस. भोसले : 'प्र. के. अत्रे, साहित्य आणि समीक्षा' : प्रथमावृत्ती : अजब पुस्तकालाय, कोल्हापूर : पृष्ठ 390.
9. प्र. के. अत्रे : 'सूर्यास्त' : तिसरी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1989 : पृष्ठ 24.
10. ल. रा. नसिराबादकर : 'आचार्य अत्रे : साहित्य दर्शन' : प्रथमावृत्ती : फडके प्रकाशन कोल्हापूर : 1976 : पृष्ठ 313, 314.
11. प्र. के. अत्रे : 'मी कसा झालो' : पाचवी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1987 : पृष्ठ 192–193.
12. प्र. के. अत्रे : 'हुंदके' दुसरी आवृत्ती : परचुरे : मुंबई : 1989 : पृष्ठ 368.
13. तत्रैव : पृष्ठ 371.
14. एस. एस. भोसले : प्र. के. अत्रे : साहित्य आणि समीक्षा' प्रथमावृत्ती : अजब पुस्तकालाय :, कोल्हापूर : पृष्ठ 411.
15. प्र. के. अत्रे : 'समाधीवरील अश्रू' : तिसरी आवृत्ती : परचुरे. मुंबई : 1991: पृष्ठ 72
16. प्र. के. अत्रे 'हुंदके' : दुसरी आवृत्ती : परचुरे : मुंबई : 1989 : पृष्ठ 369.
17. प्र. के. अत्रे : 'सूर्यास्त' तिसरी आवृत्ती ' परचुरे, मुंबई : 1989 पृष्ठ 81.
18. प्र. के. अत्रे : 'हुंदके' दुसरी आवृत्ती : परचुरे, मुंबई : 1989 : पृष्ठ 257.
19. तत्रैव : पृष्ठ 309.

*****